नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/12/2022 (बुधवार) सकाळ

## जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. पारशिवनी** :—अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा डुमरीकला फाटा येथे दिनांक २७/१२/२०२२ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— कशिश परितोष चौकसे, वय २७ वर्ष, रा. सुभाष वार्ड रामटेक यांनी वाहन चालक व आरोपी नामे— भगवान कावळे, रा. रामटेक यांना किराणा खरेदी करिता इतवारी नागपुर येथे पैसे देवुन पाठविले असता यातील आरोपी क्र. १) भगवान कावळे, वय ४३ वर्ष, रा. अंबाळा वार्ड रामटेक २) निलेश सदानंद गिरी, वय ३० वर्ष, रा. शिक्षक कॉलनी मनसर यांनी डुमरीकला फाटा जवळील निकोला बार समोर दोन मोटार सायकलने वर येवुन आरोपीतांनी गाडीमध्ये ठेवलेले रोख ४,००,०००/—रू. जबरदस्तीने हिसकावुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांना कलम ३९२, ३४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप बासोडे मो. नं. ९८२३०८३९०५ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. भिवापूर** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील सालेभट्टी कारगाव पुर्नवसन येथे दिनांक १२/१२/२०२२ ते दिनांक १५/१२/२०२२ चे दरम्यान फिर्यादी नामे— साक्षी स्वप्नील दुपारे, वय २० वर्ष, रा. सालेभटी कारगाव पुर्नवसन ता. भिवापुर हिच्या पतीचे मौजा सालेभट्टी पुर्नवसन येथे बंद खोलीचे मकान असुन त्यातील ०३ खोलीमध्ये सासू व सासरे राहत असुन एका खोलीमध्ये फिर्यादी पतीसोबत राहत होती. फिर्यादी कामानिमीत्त्य माहेरी नागपुरला गेली होती तेव्हा फिर्यादीचे पती यांचे दि. १२.१२.२०२२ रोजी रोड अपघात होवून दि. १४/१२/२०२२ रोजी उपचारा दरम्यान मरण पावले. दि. १६.१२.२०२२ रोजी फिर्यादीच्या घराची चाबी संशयीत आरोपी नामे— १) पुष्पा सुधाकर दुपारे, वय ५५ वर्ष, २) सौदागर सुधाकर दुपारे, वय ३२ वर्ष, दोन्ही रा सालेभट्टी कारगाव पुर्नवसन यांच्याकडे होती. यातील नमुद घटना वेळी व ठिकाणी त्यांनी फिर्यादीचे खोलीमधून फिर्यादीच्या पतीचे बॅक पासबुक, टिसी., आधारकार्ड व नगदी ८०००/— रूपयाचा मुद्देमाल नमूद आरोपीतांनी चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार विठठल तितरमारे ब.न. १३९९ मो. नं. ९८२३११२३९९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मौजा डोंगरगाव शिवार येथे दिनांक २३/१२/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक २६/१२/२०२२ चे १७.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— शकिल सुभान शेख, वय ५३ वर्षे, रा. फल्ली मार्केट काटोल ता. काटोल यांचे भाऊ हे काराखान्यामध्ये गेले होते तेव्हा सर्व साहीत्य कारखान्यामध्ये बरोबर होते परंतु दिनांक २६/१२/२०२२ रोजी सायंकाळी १७.३० वा. दरम्यान कारखान्यात गेले असता यातील फिर्यादी यांचे कारखान्यातील साहीत्य १) रूई पिंजाई मशीन किंमती अंदाजे २५०००/— रू. २) २ लोखंडी शटर कींमती अंदाजे ६०००/— रू. ३) ४ लोखंडी ग्रील अंदाजे वजन ३ क्वींटल किंमती अंदाजे ९०००/— रू. ४) एक लोखंडी काटा वजन व मापे एकुण किंमती अंदाजे ४०००/—रू. ५) ६ लोखंडी पाईप १० फुट लांबीचे किंमती अंदाजे २४००/— रू. ५) तसेच अमीस काकडे यांचे वाटर प्लान्ट गोडावुन मधील १.५ टन क्षमता असलेली १ चीलर मशीन किंमती अंदाजे ९००००/— रू. २) स्टील टॅक किंमती अंदाजे ४००००/— रू. ३) टेक्सो कंपणीची पाणबुडी मोटार पंप १ एच. पी. किंमती अंदाजे ८०००/— रू. असा एकुण १,८४४००/— रूपयाचा मुद्देमाल यातील आरोपी नामे—देवा उर्फ देवेंद्र जनार्दनजी खरपुरीया, वय २९ वर्ष, रा. डोंगरगाव ता. काटोल याने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३८०, ४६१ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोलते पोलीस स्टेशन काटोल मो. नं. ८०८०९५५५८९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर